वर्ष तेरावे : अंक २१ : सप्टेंबर २०२५



# कॉक्लिआ वार्ता

गणपती बाप्पा मोरया

मुकं करोति वाचालं...

COCHLEA - PUNE
कॉक्लिआ पुणे
श्रवण आणि वाचा विकासासाठी
FOR HEARING & SPEECH

◆ 1998 ◆

# COCHLEA WARTA



मा. भैयाजी जोशी
कोथरूड केंद्राला भेट







Volume Thirteen : Issue 21 : SEPTEMBER 2025 Total Pages : 16 Rs. 10/-

# रक्षाबंधन







# आला रे आला गोविंदा आला

# गोपाळकाला



COCHLEA WARTA कॉक्लिआ वार्ता

वर्ष : १३ वे | अंक : २१

**संपादक**
डॉ. अविनाश वाचासुंदर

**कार्यकारी संपादक**
सौ. मानसी दाते

**कार्यकारी मंडळ**
मृदुल हेमंत बापट
तृप्ती कोहिनकर
Mr. Ebenezer Harding

**मुद्रण :**
व्यंकटेश प्रिंटर्स, पुणे.

**मुखपृष्ठ व सजावट :**
श्री. संजीव शिंदे

## अंतरंग

**Editorial** ... ०२
- Mrs. Manasee Date

**राखी पौर्णिमा** ... ०३
– भारती तांबे

**In Unique Conversation with Respected Suresh Bhaiyaji Joshi** ... ०५
- Mrs. Pallavi Sharma

**स्वातंत्र्य दिन आणि दहिहंडी** ... ०७
– तेजश्री जाधव

**बाबा पालकांचे छोटेखानी स्नेहसंमेलन** ... ०८
– चित्रा बुझरुक

**नवीन बस.. नवा उत्साह..!** ... १२
– अर्चना भिडे

| | | |
|---|---|---|
| **Printed & Published by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Owned by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Printed by** | : | Sanjeev V. Shinde<br>Paud Road, Kothrud, Pune. |
| **Published at** | : | Cochlea Pune for Hearing and Speech<br>161-A, Modibaug, Shivsagar Society,<br>Near Mhasoba Gate, Shivajinagar, Pune 411 016. |
| **Editor** | : | Dr. Avinash Madhav Wachasundar |

# EDITORIAL

- **Mrs. Manasee Date**

The month of August was full of celebration of festivals and some remarkable events.

Usually the mothers bring the child to school, sit in the class and at home, follows the instructions given by the teacher. But all this is possible only with the support of the family members, especially the father of the child. A meeting was solely organised with this purpose for all the fathers of Swaranaad kids, on 23rd August. Every father was contacted individually and invited for the meeting. Most of them attended and their children were so happy that their father is sitting in their classroom with their favorite teacher, who explained the process of teaching their children.

The meeting started with a game to increase the interaction between the fathers. A nice detailed description and purpose of this event is described by our teacher and advisor Chitra Bujruk Madam in her write up.

Then on 8th August Rakhi Purnima was celebrated in Swaranaad. Sanjivani Balgude Tai, President of Mahila Gat Sangathan, who has been awarded by Jijai Mahila Prathishthan, Hirkani puraskar, Global women Pride and Lokmat sakhi. She had been very much impressed in her first visit to the school so she brought 16 ladies with her for the Rakhi Bandhan event. The event took place as usual with a lesson on Rakhi and narali Purnima. The children performed a Koli dance and won the hearts of all the guests, who tied rakhi to them and gave them gifts. They also felicitated all the teachers, staff and coworkers of Swaranaad. Our teacher Bharti Tambe has written very well about this event in this issue.

Independence Day was celebrated on 14th August. The children were told how the Britishers did injustice to the Indians and how our freedom fighters fought for a long time to achieve independence.

Dahi handi was celebrated on the same day. The children looked very cute, dressed like Krishna and gopikas. They did some skits on krishna's life. Then they made a small tower with teacher's help and broke the handi.

Pallavi Sharma has given a write up on the visit of Shri.Bhaiyaji Joshi on 13th August. All these celebrations and events play a very important role in progress of the Swaranaad kids.

Resham Chordiya madam, director of Panchasheel Group has been supporting our kids for cochlear implant, but when she came to know that our bus bringing children from Chinchwad is having problems and due to this the kids can't reach the school in time she immediately arranged the funds for new bus. This bus was inaugurated on 11th August at Kothrud in the presence of Shri Ranjeet Batra, Shri Kishor Velankar and Shri Aditya More. The children were very happy to sit in the bus with all the dignitaries and the dignitaries also enjoyed them. They saw the school and all of them were very much impressed with the quality of the teaching and appreciated the speech of the children.

◆◆◆

## राखी पौर्णिमा..

**भारती तांबे**
विशेष शिक्षिका, स्वरनाद, कोथरूड

नमस्कार,

दि. ८ ऑगस्ट, शुक्रवार या दिवशी आमच्या स्वरनाद शाळेत राखी पौर्णिमा हा सण साजरा केला. आमच्या शाळेत प्रत्येक सण साजरे करतात. कारण मुलांना त्याची माहिती व्हावी व सणांचे महत्त्व कळावे, हा त्यामागील उद्देश असतो. मुलेही प्रत्येक सण साजरे करताना उत्साही व आनंदी असतात.

राखी पौर्णिमा हा लेसन घेण्याची जबाबदारी मी व माझी सहशिक्षिका अस्मिता मॅडमने घेतली. योगायोग असा झाला बालगुडे ताईंनी मला विचारले मी राखी पौर्णिमा तुमच्या शाळेत साजरी केली तर चालेल का? माझीही खूप दिवसांची इच्छा होती ताईंना शाळेत बोलवायचे त्या दरवर्षी एखाद्या आश्रमात किंवा दिव्यांग मुलांच्या शाळेत जाऊन राखी पौर्णिमा मुलांसोबत साजरी करतात. मृदुला मॅडम यांनी शाळा पहायला लगेच होकार दिला.

बालगुडे ताईचे समाजकार्य खूप मोठे आहे. त्या महिला बचत गट संघटक अध्यक्षा आहेत. त्याचबरोबर महिलांसाठी सतत कार्य करत असतात. जिजाई महिला प्रतिष्ठान, महिलांसाठी वेगवेगळी शिबिरे, लघुउद्योग आरोग्य शिबीरे, नृत्यस्पर्धा, असे विविध उपक्रम राबवत असतात. त्यांच्या कार्याबद्दल त्यांना पुरस्कार, हिरकणी पुरस्कार, ग्लोबल वुमन प्राईड पुरस्कार लोकमत सखी मंच हे पुरस्कार मिळाले आहेत.

बालगुडे ताई जेव्हा शाळा पहायला आल्या तेव्हा शाळेतील शिक्षिकांचे काम पाहून त्या भारावून गेल्या. त्यांनी बचत गटातील महिलांना आमचे शाळेतील काम कसे चालते हे दाखवायचे ठरवले.

आम्ही राखी पौर्णिमा लेसनचे नियोजन, दीपप्रज्वलन, सूत्रसंचालन याची तयारी केलीच होती. दुपारी १ नंतर बालगुडे ताई व बचत गटातील सोळा महिलांचा ग्रुप आला कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने झाली. बालगुडे मॅडम व रक्षा मॅडम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. नंतर रक्षा मॅडम यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. अस्मितातार्ईंनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

सगळ्यांना उत्सुकता लागली होती ती छोट्या मुलांच्या डान्सची. ही मुले कोळी वेशभुषा करून आली होती. या वेशभूषेत मुले खूपच सुंदर दिसत होती. मुलांनी कोळीनृत्य सादर केले. पालक, शिक्षिका व पाहुण्यांनी त्यांना टाळ्या वाजवून प्रोत्साहन दिले.

रक्षा मॅडम यांनी मनोगत व्यक्त केले. रक्षा मॅडम म्हणजे उत्कृष्ठ मार्गदर्शक, प्रेमळ व्यक्तिमत्त्व, मनात निस्वार्थ भावना, सगळ्यांशी जिव्हाळ्याचे नाते तयार करणाऱ्या, त्यांनी त्यांच्या मनोगतामध्ये कर्णबधिरत्त्व म्हणजे काय? हे सांगितले व त्यासाठी तुम्ही सर्व महिला आम्हाला कशी मदत करू शकाल हे सांगितले. त्या म्हणाल्या तुम्हाला जर एखादे कर्णबधिर मूल आढळले तर अशा मुलांची शाळा आहे व त्यांना आपल्या स्वरनाद शाळेत संपर्क साधायला सांगा. त्या मुलांकडे दुर्लक्ष करू नका.

प्रमुख पाहुण्या संजीवनी बालगुडे ताई यांनी मुलांचे व शिक्षिकांचे खूप कौतुक केले. पालकांचेही कौतुक केले. शिक्षिकांमधील पेशन्स पाहून त्यांनी शिक्षिकांना हॅट्स ऑफ केले व कौतुक केले.

मी मुलांना राखी पौर्णिमा सणाची माहिती सांगितली. लेसन कसा घेतला जातो, त्यातून मुलांची भाषा वाढ कशी होते. त्यामध्ये बहीण–भाऊ, भेटवस्तू, राखी त्याचबरोबर कोळी लोक समुद्राला नारळ वाहून पूजा करतात, हे प्रत्यक्ष कृतीतून दाखवले. त्यामुळे मुलांना लेसन समजला.

मृदुला मॅडम यांनी सेंटरबद्दल व कामाबद्दल सविस्तर माहिती सांगितली तसेच आपल्या इतर सेंटर विषयी बोलल्या व आभार प्रदर्शन केले.

बचत गटातील महिलांनी मुलांना राख्या बांधल्या, खाऊ दिला, शाळेला भेटवस्तू दिली. मुलांना आनंद झाला होता व त्याही आनंदी होत्या हे त्यांच्या चेहऱ्यावरून दिसत होते. माझ्या सगळ्या सहशिक्षिकांचा, मावशी, स्टाफ यांचा सत्कार केला.

मृदुला मॅडम यांनी पाहुण्यांचे आदरातिथ्य अगदी व्यवस्थीत केले. त्यामुळे त्यांना आपली शाळा, शाळेतील शिक्षिका, व्यवस्थापन कमिटीचे खूप कौतुक वाटले.

सगळ्यात शेवटी मी असे सांगेन, समाज कार्य वेगळे असेल.. तरी रक्षा मॅडम व बालगुडे मॅडम यांचे ध्येय एकच आहे. दोघीही महिला सशक्तीकरण करण्याचा प्रयत्न करतात. कार्यपद्धती वेगळी असली तरी ध्येय एकच आहे. त्यामुळे हिरकणींची समाजाला खूप गरज आहे. या हिरकणींना माझा मानाचा मुजरा !

◆◆◆

## In Unique Conversation with Respected Suresh Bhaiyaji Joshi

At Swaranaad, Kothrud.

**- Pallavi Sharma**

Swaranaad Rehabilitation Center at Kothrud, every year, sees a variety of events, festivals,celebrationsand visits by eminent personalities having expertise in their field from different walks of life. This year was no exception.

On Wednesday, August 13th, 2025, it was aspecial day for us. HonourableSureshBhaiyaji Joshi, paid a visit to ourSwaranaadRehabilitationCenter, Kothrud.He is fondly known as BhaiyajiJoshi. He was associated with RSS from a very young age. He is a prominent member of the RashtriyaSwayamsevak Sangha. He has been extremely active in various social activities, because of which, he got re-elected for the 4th term. He was the General Secretary, second in command, of RSS from 2009-2021.Currently, he is a member of Executive Committee of RSS.Till date he is active in every way he can contribute for the continuous progress of social welfare.

Our morning commenced with welcomingBhaiyaji andthere was an informal conversation with Raksha ma'am and Dr Avinash Sir, giving apowerful insight to create a simple and structured format of our working system, so that a layman whowish to get involved can work in our field of intervention and rehabilitation for hearing-impaired children.

He was escorted to every floor where in he engaged in fruitful dialogues with the teacher and the children of their respective classes. The children greeted him with a namaste and a smile.

After a tour given to all our classrooms and facilities, he was guided back to the Director's cabin where in more productiveconversations took place over a cup of tea with Dr Avinash Sir, and Raksha ma'am.

A visit is never complete without the interaction with our children'score and primary caregivers. Bhaiyaji made our teachers comfortable through an interactive question-answer session. During this interaction, he sowed athought-provoking question by asking them to narrate one good and one bad

experience during their tenure at this organization. The teachers actively participated sharing their experiences which were both touching and heart melting.Our teachers enjoyed this interaction.

Last but not the least, Bhaiyaji's short and simple,yet impactful knowledge he imparted was discoursing our Special Educators not only to focus on treating and rehabilitating these children through speech and language but to focus on their mental wellbeing as well, teaching, guiding, helping them togrow into good human beings and fulfil one's unique role in contributing to oursociety.This resonated very well with our teachers and have promised to continue working with dedication towards our little hearing-impaired friends.

Bhaiyaji's visit concluded with gratitude from all of usand a warm gesture by Dr Avinash Sir and Raksha Ma'am by felicitating him and his associates with beautiful paper flowers made by our talented team members.

In the months to come, we look forward to many more such wonderful visits by good Samaritans.

◆◆◆

**Your generosity can make a deaf child Speak**

Cochlea is registered under :
BPT 1950 Act.
Society Reg. Act.
PAN No. AAATC5056E

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | 'Cochlea Pune for Hearing and Speech' |
| Account No. | : | 60040230428 |
| Bank | : | Bank of Maharashtra |
| Branch | : | Shivajinagar, Pune. |
| IFSC Code | : | MAHB0000043 |

**All Donations are exempt under section 80G of the Income Tax Act.**

## स्वातंत्र्य दिन आणि दहीहंडी

**तेजश्री जाधव**
विशेष शिक्षिका, कोथरूड केंद्र



दिनांक १४ ऑगस्ट गुरुवार या दिवशी स्वातंत्र्यदिनाचा पाठ घेतला मुलांना आपला देश आणि स्वातंत्र्य सैनिक यांच्याबद्दल माहिती करुन देण्यात आली. पी.पी.टी. च्या मदतीने मुलांना इंग्रजांनी भारतीयांवर केलेले अन्याय दाखविले. यानंतर स्वातंत्र्यवीरांनी पुढाकार घेऊन इंग्रजांना देशातून बाहेर काढले आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. हे सहज सोप्या भाषेत समजावून दिले.

याच दिवशी आपल्या शाळेत गोकुळाष्टमी निमित्त दहीहंडीचा लेसन घेण्यात आला.

वैष्णवी मॅडम आणि चिमोटे मॅडम या शिक्षिकांनी हा लेसन घेतला. दहीहंडीची माहिती मुलांना समजण्यासाठी प्रत्यक्ष वस्तू दाखविल्या. तक्ता, शब्दचिठ्ठ्या, चित्रे वापरुन दहीहंडी सणाची माहिती दिली.

दहीहंडी का साजरी करतो, हे समजण्यासाठी नाट्यीकरणाच्या माध्यमातून मुलांना कृष्ण व गोपिका यांच्या वेशभूषा करुन दहीहंडीचा प्रत्यक्ष अनुभव दिला. प्रत्यक्ष पाळणा आणून कृष्णजन्माचे प्रात्यक्षिक दाखविले.

प्रत्यक्ष दहीहंडी बांधण्यात आली होती. मुलांनी गोप–गोपिका बनून डान्स केला. त्यानंतर गोविंदा बनलेल्या मुलांनी मनोरा करुन दहीहंडी फोडली. सर्वांनी गोपाळकालाचा प्रसाद घेतला.

◆◆◆

## बाबा पालकांचे छोटेखानी स्नेहसंमेलन

– चित्रा बुझरुक
स्पेशल प्रोजेक्ट ऑफिसर, स्वरनाद, कोथरूड

कर्णबधिर बालकांच्या वाचा–भाषा प्रशिक्षणाचा प्रवास तसा खडतरच असतो, त्यात कुटुंबाची साथ नसली तर ते अजून कठीण होते. कुटुंबाची साथ विशेष करून बाबांची साथ मिळावी व बाबांना स्वरनाद शाळेची माहिती मिळावी या हेतूने दरवर्षी बाबांची मीटिंग घेतली जाते. यंदा शनिवार दिनांक २३ ऑगस्टला ही मीटिंग ठरल्याप्रमाणे झाली.

सर्व बाबांना मीटिंगला उपस्थित राहता यावे म्हणून प्रत्येकाला व्यक्तिगत मेसेजद्वारे आगाऊ सूचना देण्यात आली होती, त्यामुळे बहुसंख्य बाबा मीटिंगला उपस्थित होते. मुलं बाबा शाळेत आल्यामुळे खूप खुश होती. बाबापण उत्साहात मुलांच्या वर्गात बसले होते. शिक्षिकेंनी बाबांना श्रवण प्रशिक्षणाचे प्रात्यक्षिक दाखवले.

बाबा पालकांची एकमेकांशी ओळख व चर्चा होण्याच्या हेतूने मीटिंगचे स्वरूप थोडे बदलले होते.

आलेल्या बालकांच्या बाबांचे ४ गट केले होते प्रत्येक गटाला एक प्रश्न दिला होता.

१. माझ्या कर्णबधिर बालकाचे संगोपन करतांना माझे ध्येय काय आहे?

२. माझ्या बालकाच्या संगोपनात माझे काय दायित्व आहे?

३. माझ्या बालकाला वाढवतांना माझी व स्वरनादची काय भागीदारी आहे?

४. स्वरनादमध्ये माझ्या बालकाला जे मिळाले ते समाजाला द्यायला मी कसा बांधील आहे?

चारही गटातील बाबांनी पूर्णपणे समरसून आपापल्या गटातील चर्चेत भाग घेतला. चर्चेअंती प्रत्येक गटांनी आधी सांगितल्याप्रमाणे कागदावर मुख्य मुद्दे लिहून ठेवले. त्यानंतर चहा–पोह्याच्या मध्यांतरानंतर रक्षाताईंचे प्रेझेंटेशन झाले. त्यांनी सर्व बाबांचे स्वागत व अभिनंदन केले व बाबांचा मुलाच्या वाढीत किती महत्त्वाचा वाटा आहे हे सांगितले. बाबा हे मुलांचे रोल मॉडेल असतात, त्यांना आपल्या बाळाच्या भविष्याची काळजी असते पण आपली सामाजिक जडण घडण अशी झाली आहे की बाबांना भावुक होण्याची, आपल्या भावना व्यक्त करण्याची मुभा नाही. बाबांना पण व्यक्त होण्याची आवश्यकता आहे, या मुद्यावर त्यांनी भर दिला.

पहिल्यांदा मीटिंगला आलेल्या बाबांची संख्या अधिक असल्यामुळे त्यांनी मागच्या वर्षीच्या मीटिंगमध्ये चर्चा केलेल्या व वर्षभर राबवलेल्या थीमने सुरुवात केली.

– मी माझ्या मुलाचा तो आहे तसा **स्वीकार** केला आहे.

– मी माझ्या मुलाला बोलतं करून त्याच्या सर्वांगीण विकासाचा **संकल्प** केला आहे.

– मी माझ्या मुलाच्या वाचा–भाषा विकासात **सातत्य** राखले आहे.

स्वीकार, संकल्प व सातत्य याचा अर्थ आपल्या मुलांच्या संदर्भात काय आहे हे रक्षाताईंनी सविस्तर समजावून त्यावर थोडी चर्चा केली.

यंदाच्या मीटिंगचा विषय पालकांना दिलेल्या प्रश्नांवरच आधारित होता. रक्षाताईंनी प्रत्येक गटानी लिहिलेले मुद्दे त्या गटप्रमुखाला वाचायला सांगून त्यावर स्वतःचे विचार मांडले व चर्चा केली. या पद्धतीने सर्व बाबांना त्यांच्या प्रतिनिधी मार्फत स्वतःचे विचार मांडायची संधी मिळाली. सर्व बाबांनी खूप विचार करून अत्यंत योग्य असे मुद्दे मांडले होते. चर्चेत आलेले काही प्रमुख मुद्दे खाली नमूद केले आहेत :

– आपल्या मुलाचा आहे तसा स्वीकार केला तरच आपण त्याचा सर्वांगीण विकास साधू शकतो.

– आपल्या प्रयत्नात सातत्य ठेवले नाही तर आपल्याला आपले ध्येय गाठणे कठीण होईल.

– मुलांचा सर्वांगीण विकास ही संकल्पना समजावली व तो कसा साधायचा यावर चर्चा केली. असा विकास साधायला आई–वडील व इतर नातेवाईक यांनी मिळून प्रयत्न करायला हवा, आपल्या बालकाच्या वाढीत त्यांची भागीदारी हवी. त्यांनी बालकांबरोबर पुरेसा वेळ घालवायला हवा व सतत संवाद साधायला हवा. ताईंनी संवाद व भाषण यातला फरक पण समजावून सांगितला, संभाषण खुंटु न देता संवाद सतत चालू कसा ठेवायचा यावर पण चर्चा झाली.

– ताईनी सांगितले की मूल जन्माला आल्यावर आपल्या घरात दोन सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लागतात जे आपल्यावर सतत लक्ष ठेवून असतात आणि ते म्हणजे आपल्या बाळाचे दोन डोळे, ते डोळे सतत आपले निरीक्षण करून अनुकरण करत असतात, त्यामुळे सर्वप्रथम आपण आपले वागणे योग्य ठेवले पाहिजे. आपण आपल्या वागण्यात योग्य तो बदल केला तरच बाळाचे वागणे योग्य होईल.

– ताईंनी मुलांना शाळेत नियमित आणण्याचे महत्त्व समजावले. त्यांनी बाबांना आईला या बाबतीत मदत करायला हवी असे सांगितले. त्या पुढे म्हणाल्या की, सुट्टीची तीनच कारणे असू शकतात. खूप आजारी आहे, खूपच

महत्त्वाचे काम आहे आणि बाहेर गावी जावे लागणार आहे किंवा आपण या जगातच नाही!

– प्रत्येक मूल वेगळे आहे, आपल्याला त्याची कोणाशी तुलना करायची नाही, त्याचे कलागुण ओळखून त्याप्रमाणे त्याला शिकवायला हवे.

– पूर्वी बहुतेक मुलांना फक्त कर्णबधिरत्व असायचं साधारण २० टक्के मुलांना इतर काही समस्या असायच्या परंतु सध्या ही परिस्थिती बदलली आहे. २०–२५ टक्के मुलेच फक्त कर्णबधिर असतात इतर मुलांना काहीतरी वेगळी समस्या देखील असते. उदा. अतिचंचलता, अध्ययन अक्षमता इ. त्याला बरीच कारणे आहेत. वातावरणातील किंवा आपल्या खाद्य पदार्थातील प्रदूषण, वाढलेला स्क्रीन टाइम, अयोग्य आहार इ. काही कारणांवर आपले नियंत्रण नाही, परंतु आपल्या बालकाच्या सर्वांगीण विकासाच्या हेतूने आपण काही गोष्टी नक्कीच करू शकतो. मुलांना मर्यादित प्रमाणात गोड/साखर देणे, चॉकलेट, बिस्किटे, चिप्स इ. आयते मिळणारे पदार्थ टाळणे, ताज्या भाज्या, फळे इ. पोषक आहारात भर देणे, मोबाईल, टी.व्ही न दाखवणे इ. मुलांना शक्य असेल तेव्हा बाहेर बागेत मोकळ्या हवेत खेळायला नेणे, त्यांना इतर मुलांमध्ये मिसळायची संधी देणे. परिसरातील वेगवेगळ्या वस्तू व प्रसंग दाखवून समजावून सांगणे. त्यांना गोष्टीचे पुस्तके वाचून दाखवणे – थोडक्यात त्यांना शक्य तेवढा वेळ व प्रयोत्साहन देऊन भरपूर प्रेम देणे.

आपण आपल्या शाळेतील प्रत्येक मुलाचे IQ / DQ टेस्टिंग करतो व त्या प्रमाणे पालकांना मार्गदर्शन करतो. त्या पुढे म्हणाल्या की, विभक्त कुटुंब पद्धती, फ्लॅट संस्कृति इ. मुळे आपल्याला समुपदेशकाची (counselor) गरज भासायला लागली आहे. आपल्याला काही अडचणी असतील तर आपल्याला बोलायला, विचारायला कोणी नाही, आपल्याला व्यक्त होण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे आपली कुचंबणा होते व डिप्रेशन वगैरे सारख्या समस्या उद्भवतात. त्यांनी सांगितले की आपण सर्व या स्वरनाद परिवाराचे सदस्य आहोत, आपण आपल्या बालकाच्या विकासासाठी स्वरनादशी व एकमेकांशी भागीदारी करायची गरत आहे. आपण आपले अनुभव एकमेकांशी शेयर करा, एकमेकांच्या अनुभवातून शिका व एकमेकांना आधार द्यावा जेणे करून आपण सर्व प्रगती करू –

एक एका साह्य करू । अवघें धरू सुपंथ ।।

ताईंनी सांगितले – आपल्या स्वरनादमध्ये तीन वर्षांचा अभ्यासक्रम आहे. प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे की, त्यांनी ही तीन वर्ष पूर्ण करावीत,

integrate होण्याची घाई करू नये. तशी घाई केली तर आपल्या मुलाला १-२ वर्ष कदाचित त्रास होणार नाही पण जर त्याचा पाया नीट विकसित झालेला नसेल तर पुढे नक्की त्रास होईल. त्यांनी पुढे सांगितले की आपल्या कर्णबधिर बालकाचा भाषा विकास उशिरा सुरू होतो, त्याला त्याच्या लेव्हलला आणण्यासाठी आपल्याला अधिक प्रयत्न करावे लागतात व तेवढा वेळ पण द्यावा लागतो, तरी पालकांनी संयम दाखवण्याची गरज आहे. या मुद्याचे महत्व पटावे म्हणून एक गोष्टरूपी व्हीडियो पण दाखवला.

ताईंनी सामाजिक बांधिलकी या विषयावर पालकांचे मत विचारले. त्यांनी सांगितलेल्या मुद्यांचे समीकरण करून त्यांनी पालकांना आवाहन केले की, आपण स्वरनाद बद्दल आपल्या ओळखीच्या लोकांशी बोलावे, त्यांना कर्णबधिरत्वाची व त्यावरील उपायांची माहिती द्यावी व समाजात या विषयी जागृती करावी. त्यांनी लवकर निदान व लवकर उपचार या विषयी आपण जनजागृती करायची आवश्यकता आहे, हे सांगितले. आपल्या सोशल मिडिया पेज बद्दल माहिती दिली व पालकांना लाइक, फॉलो, शेअर करायला प्रेरित केले.

शेवटी ताईंनी चर्चा केलेल्या सर्व मुद्यांचे समीकरण खालीलप्रमाणे :

साधण्यास प्रगती आपुल्या कर्णबधिर बालकांची,

भागीदारी आहे ही स्वरनाद आणि पालकांची,

ठेवून जाण सामाजिक बांधिलकीचे,

स्वीकारू दायित्व आपल्या ध्येयपूर्तीचे.

प्रश्नोत्तराच्या वेळी ताईंनी सर्व बाबांच्या प्रश्नांचे निरसन करून सर्वांना समधानकारक उत्तरे दिली. काही बाबांनी आपले मनोगत व्यक्त केले, एका बाबांनी काही पालकांची इतर ठिकाणी झालेली आर्थिक फसवणूक या विषयी सविस्तर माहिती व सावधानतेचा इशारा दिला. त्यांनी सर्वांना सांगितले की, कर्णबधिरत्वावर मशीन लावणे किंवा ऑपरेशन करणे हे दोनच उपाय आहेत कुठल्याही औषध, धूप अंगारा इ. उपयांनी कर्णबधिरत्व दूर होत नाही तरी पालकांनी अशा फसवणुकींपासून सावध राहावे.

सर्व बाबांनी झालेल्या मिटिंगबद्दल समाधान वाटले अशी प्रतिक्रिया व्यक्त केली व त्यांना अशी मीटिंग अधिकवेळा झालेली आवडेल अशीही प्रतिक्रिया दिली. उपस्थित असलेल्या प्रत्येक बाबाला आपल्या पाल्याच्या संगोपनाच्या दृष्टीने काहीतरी नवीन माहिती मिळाली अशी भावना होती.

◆◆◆

## नवीन बस.. नवा उत्साह..!

**अर्चना भिडे**
विशेष शिक्षिका, स्वरनाद, कोथरूड केंद्र

पंचशील ग्रुपच्या डायरेक्टर श्रीमती रेशम चोरडीया मॅडमनी स्वरनाद उरवडे केंद्रासाठी तसेच स्वरनाद पुनर्वसन केंद्रातील मुलांच्या इम्प्लांटसाठी भरघोस मदत केली आहे. चिंचवडची बस सध्या खूप जुनी झाली होती. बसला सतत दुरुस्तीची गरज पडत होती. त्यामुळे बरेचदा चिंचवड वरून येणाऱ्या मुलांची गैरसोय होत होती याबद्दल मागणी केली असता, स्वरनाद मधील मुलांची येण्या–जाण्याची सोय करण्यासाठी स्वरनाद पुनर्वसन केंद्राला या संस्थेला पंचशील ग्रुप तर्फे नवीन बससाठी देणगी देण्यात आली. त्या दिवशी बसच्या उद्घाटनाचा एक छोटासा कार्यक्रम केला गेला. काही कारणास्तव श्रीमती रेशम चोरडिया मॅडम उपस्थित राहू शकल्या नाहीत पण त्या कार्यक्रमासाठी, श्रीयुत रणजीत बात्रा सरण हे पाहुणे म्हणून लाभले होते.

पंचशील उद्योग समूहाच्या व्हेंटिव हॉस्पिटॅलिटी LTD चे CEO तसेच किशोर वेलणकर पंचशील उद्योग समूहाच्या व्हेंटिव हॉस्पिटॅलिटी LTD चे HR, व श्रीयुत आदित्य मोरे हे या उद्घाटनासाठी उपस्थित होते.

पाहुण्यांचे स्वागत डॉ. अविनाश वाचासुंदर सर, संस्थेच्या शिक्षण संचालिका सौ. रक्षा देशपांडे मॅडम व स्वरनाद कोथरूड केंद्राच्या मुख्याध्यापिका मृदुला देवळाणकर मॅडम यांनी केले.

सर्व पाहुण्यांनी सर्वप्रमथम स्वरनाद पुनर्वसन केंद्र संपूर्ण पाहिले. बऱ्याच शिक्षकांबरोबर संवाद साधला तसेच मुलांशीही संवाद साधला. कार्यक्रमाच्या वेळी डॉक्टर वाचासुंदर यांनी त्यांच्या मनोगतामध्ये आपल्या शाळेला बस मिळाली. त्यांनी खूप मोठी आपली सोय केली आहे हे सांगितले. सरांनी थोडक्यात शाळेबद्दल माहिती दिली. तसेच मुलं किती लांबून येतात व त्यांना येण्यासाठी किती अडचणी येतात याबद्दलही सांगितले. श्री. किशोर वेलणकर व आदित्य मोरे यांनीही त्यांचे मनोगत सांगताना त्यांना शाळा खूप आवडली आणि या मुलांसाठी केंव्हाही मदत करण्यासाठी ते तत्पर असतील असे त्यांनी सांगितले. श्रीयुत रणजीत बत्रा यांनी आपले मनोगत सांगताना केंद्रातील मुले किती छान बोलतात, या बद्दल कौतुक केले व या लहान मुलांसाठी तर बसची सोय केलेलीच आहे पण अजूनही केंद्रात जी मुलं शिकली व आता मोठी आहेत, त्यांच्यासाठी नोकरीची संधीसुद्धा आम्ही मिळवून देण्यासाठी मदत करू, असेही सांगितले.

सौ. रक्षा देशपांडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, चिंचवडच्या मुलांना ही नवीन बस मिळाली त्यामुळे केंद्राचा अजून एक फायदा झाला की हडपसर वरून येणाऱ्या मुलांसाठी पण आता बसची सोय करता येईल. त्यामुळे पंचशील ग्रुपने केंद्राला दुप्पट फायदा करून दिलेला आहे. असे सांगून पाहुण्यांचे आभार मानले. मृदुला देवळाणकर मॅडमनी सर्व पाहुण्यांचे आभार मानले.

छोटीशी नवीन बसच्या उद्‌घाटनाची सभा संपल्यानंतर केंद्राला मिळालेल्या नवीन बसची पूजा श्रीयुत रणजीत बात्रा यांच्या हस्ते नारळ फोडून व बसला हार घालून करण्यात आली. त्याचबरेबर सर्व मुलांना व उपस्थित सर्व शिक्षिका व पाहुण्यांना पेढे देण्यात आले. सर्व मुलांना एकदा बस मध्ये बसवून मुलंबरोबर पाहुण्यांचा फोटो काढण्यात आला. मुलांना नवीन बस मध्ये बसण्याचा खूप आनंद मिळाला. अशाप्रकारे स्वरनाद पुनर्वसन केंद्राला मिळालेल्या देणगी स्वरूपातल्या नविन बसचा उद्‌घाटन समारंभ संपन्न झाला.

◆◆◆



## SWARANAAD REHABILITATION CENTER
## Monthly Achievement - AUGUST 2025

| Sr. No. | FACILITIES | SESSION / STUDENT COUNT |
|---|---|---|
| 1. | Speech Therapy Sessions | 246 |
| 2. | No. of Student getting Speech Therapy | 54 |
| 3. | Aided Audiogram Testing | 9 |
| 4. | No. of Speech Assessment | 3 |
| 5. | No. of Counseling Sessions | 13 |
| 6. | Individual Occupation Therapy Sessions | 23 |
| 7. | Group Occupational Therapy Sessions | 2 |
| 8. | Psychological Assessment | --- |
| 9. | No. of students getting Individual OT | 43 |
| 10. | No. of OT Screening | 3 |
| 11. | No. of Activity Therapy Session | 21 |

## SWARANAAD OUTREACH CENTER
## Monthly Achievement - AUGUST 2025

| Sr. No. | CENTERS | THERAPY SESSION |
|---|---|---|
| 1. | Khed | --- |
| 2. | Narayangoan | 32 |
| 3. | YCM Pimpari | 68 |
| 4. | Morya Chinchwad | 29 |
| 5. | Phonda | 58 |
| 6. | Porvorim | 50 |
| 7. | Manchar | 63 |
| 8. | Daund | 30 |
| 9. | Urawade (Residential) | 52 |
| 10. | Kudal | 30 |

# होय! प्रत्येक कर्णबधिर मूल बोलेल..

**कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग अ‍ॅण्ड स्पीच**

**स्वरनाद कर्णबधिर बालकांचे पुनर्वसन केंद्र**

## निवासी केंद्राची वैशिष्ट्ये

**प्रवेश चालू २०२५-२६**

१. २५ कर्णबधिर मुले आणि त्यांची माता यांची निवास व्यवस्था
२. दृश्य आणि क्रियाकलाब आधारित
३. शिक्षणावर विशेष भर देऊन पूर्व प्राथमिक शिक्षण
४. जवळपासच्या गावातील कर्णबधिर मुलांसाठी बालवाडी
५. भोजन व्यवस्था दालन - ५० जणांसाठी
६. लवकर निदान आणि हस्तक्षेप
७. बालक पालक कार्यक्रम
८. वाचा भाषा प्रशिक्षण (० ते ६) वयोगटातील मुले
९. नियमित वाचा भाषा विकास मूल्यांकन श्रवण तज्ज्ञांकडून श्रवण चाचणी
१०. पालक प्रशिक्षण कर्णबधिर मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्या मातांना सक्षम करणे.
११. विशेष शिक्षकांचे प्रशिक्षण

: संपर्कासाठी :

**9923289844 / 9822094940**

**HTTPS://COCHLEASWARANAAD.ORG/**

**पुसाळकर स्वरनाद माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
**उरवडे, तालुका मुळशी, जि. पुणे.**

## संस्थेची केंद्र

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांचे बहुआयामी अपंग पुनर्वसन केंद्र**
बिंदू माधव ठाकरे दवाखाना,
गोसावी वस्ती समोर, हॅप्पी कॉलनी रोड,
कोथरूड, पुणे – ४११ ०३८.
**संपर्क : रक्षा देशपांडे ९९२३२८९८४४**
**मृदुला देवळाणकर ८५५०९१२९७७**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, चिंचवड**
मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,
पिंपरी–चिंचवड लिंक रोड, पी.एम.टी.
शेवटच्या बसस्टॉप समोर, चिंचवडगाव,
पुणे – ४११ ०३३. **फोन : ९८२२६७१८४०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, खेड**
डॉ. खडके गेस्ट हाऊस,
राजगुरुनगर बाजारपेठ, ता. खेड, पुणे.
**फोन : ९८५०७३८२७६**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, नारायणगाव**
सावळेराम मार्केट, नारायणगाव,
डॉ.वाचासुंदर कान–नाक–घसा क्लिनिक, पुणे.
फोन : ९७६६२६२३२७; ७७९८४३४९८९

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांची पूर्व प्राथमिक शाळा, पर्वरी–गोवा**
अनघा, प्लॉट नंबर १५, पी.डी.ए. कॉलनी,
पर्वरी बार्देश, गोवा – ४०३ ५२१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**श्री शारदा ग्रंथ प्रसारक संस्था, सांचालित स्वरनाद कर्णबधिर मुलांसाठी पूर्व–प्राथमिक विद्यालय**
एफ–४, पहिला मजला, पै हाऊस सदन,
फौंडा, गोवा – ४०२ ४०१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, पिंपरी**
वाय.सी.एम. हॉस्पिटल,
(पिंपरी–चिंचवड पालिकेच्या संयुक्त विद्यमाने) पिंपरी.
**फोन : ८०८७२२९९५४**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, दौंड**
शालीमार चौक, आनंद अपार्टमेंट,
'सी' विंग, फ्लॅट नं.२,
फॉरेस्ट ऑफिस समोर, ता. दौंड, पुणे.
**फोन : ७०४०६६८०७१/८६६८८३१२११**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, मंचर**
डॉ. तोडकर हॉस्पिटल, पिंपळगाव फाटा,
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**फोन : ८४५९०१९६०२**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, कुडाळ**
लायन्स सेवा संकुल कुडाळ, अभिनवनगर,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
**फोन : ९४०५९९८९८९**


**'पुसाळकर स्वरनाद' माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
माँटवर्ट विस्टा समोर, सर्वे नं. ४२५,
उरवडे, पिरंगुट, ता. मुळशी,
पुणे – ४१२ ११५.
**फोन : ८३०८८३२१४५**




# स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा..!














# विविध केंद्रातील गणेशोत्सव




RNI No. : MAHBIL/2013/59067
SDM/PUNE/SR/21/2015
Registration No. : PCW/195/2023-25

Published and Posted on 10th SEPTEMBER, 2025
Posted at Model Colony PSO, Pune 411 016
on 10 of each month.

## बाबा पालकांची मीटिंग










## नवीन बसचे उद्घाटन

Address :
To,